**आदर्शगाव योजनेंतर्गत "यशवंतराव चव्हाण एकात्मिक ग्रामीण विकास प्रशिक्षण केंद्र" हिवरेबाजार ता.जि.अहमदनगर कार्यान्वित करणेसाठी अभ्यासगट गठीत करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक. आगायो-२०२१/प्र.क्र.११४/जल-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २८ एप्रिल, २०२२

**वाचा :- शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक**

१. मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. आगास-२०१०/प्र.क्र.२६/जल-८, दिनांक ०६ मार्च, २०१२
२. **संचालक मृदसंधारण तथा आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे यांचे**
   a.पत्र क्र. आगास/हिबाप्रकेंबां/अभ्यासगट/२०५२६/२०२१, दि. ३० ऑक्टोंबर, २०२१
   b.पत्र क्र. आगास/हिवरेबाजार/प्रशि.केंद्र/५१९०/२०२१-२२, दि. १० फेब्रुवारी, २०२२

**प्रस्तावना :-**

आदर्शगाव संकल्प व प्रकल्प योजना दि. २० फेब्रुवारी, १९९२ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. सदर योजना लोकसहभागातून ग्राम विकास या संकल्पनेवर आधारित आहे. गावाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टिने शासनाच्या विविध योजना या गावामध्ये राबविण्यात येतात.

आदर्शगाव योजनेंतर्गत यशवंतराव चव्हाण एकात्मिक ग्रामिण विकास प्रशिक्षण केंद्र, मौजे हिवरेबाजार, ता. नगर, जि. अहमदनगर चे बांधकाम पूर्णत्वास आलेले आहे. सदर प्रशिक्षण केंद्रामध्ये १२० प्रशिक्षणार्थी करिता निवासासह प्रशिक्षणार्थी सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. सुविधांमध्ये वाढ करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

प्रस्तुत केंद्र नविन असल्यामुळे आदर्शगाव योजनेतील प्रशिक्षणाबरोबरच इतरही प्रशिक्षण घेणे शक्य होणार असल्याने, प्रशिक्षण केंद्र संचलीत करण्यासाठी आस्थापना निर्माण करणे, निधीचा स्त्रोत निश्चित करणे, देखभालीचे धोरण ठरविणे, अल्प व दीर्घ कालीन प्रशिक्षणाचा कार्यक्रम निश्चित करणे तसेच प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम निश्चित करणे, याकरिता अभ्यास गटांची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

आदर्शगाव योजनेतील प्रशिक्षणाबरोबरच इतरही प्रशिक्षण घेणे शक्य होणार असल्याने, प्रशिक्षण केंद्र संचलीत करण्यासाठी आस्थापना निर्माण करणे, निधीचा स्त्रोत निश्चित करणे, देखभालीचे धोरण

ठरविणे, अल्प व दीर्घ कालीन प्रशिक्षणाचा कार्यक्रम निश्चित करणे तसेच प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम निश्चित करणे, यासाठी खालीलप्रमाणे अभ्यासगट नियुक्त करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | प्रस्तावित पदस्थापना |
|---|---|---|
| १ | कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे. | अध्यक्ष |
| २ | संचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे. | सदस्य |
| ३ | वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , पुणे. | सदस्य |
| ४ | संचालक, राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियान. | सदस्य |
| ५ | सह सचिव/उप सचिव (जल-८), मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ६ | अवर सचिव (जल-८), मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ७ | श्री. इंद्रजित देशमुख, माजी सह मुख्यकार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे. | सदस्य |
| ८ | संचालक, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, पुणे. | सदस्य |
| ९ | संचालक, प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट्स प्रा.लि. पुणे. | सदस्य |
| १० | मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी फाऊंडेशऩ, मुंबई. | सदस्य |
| ११ | श्री. आनंद पुसावळे, प्राध्यापक, यशदा, पुणे. | सदस्य |
| १२ | श्री. रफिक नाईकवाडी, विशेष कार्यअधिकारी, मंत्री कृषी व माजी सैनिक कल्याण, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| १३ | श्री. उमाकांत दांगट (सेवानिवृत्त), कृषि आयुक्त, कृषि आयुक्तालय, पुणे. | सदस्य |
| १४ | प्रा. प्रतापराव चिपळूणकर, प्रगतशिल शेतकरी, कोल्हापूर. | सदस्य |
| १५ | श्री. नामदेव ननावरे (सेवानिवृत्त), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड. | सदस्य |
| १६ | आदर्शगाव योजना-प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा (संस्था) प्रतिनिधी-१ | निमंत्रित सदस्य |
| १७ | पंचायत राज प्रतिनिधी-१ | निमंत्रित सदस्य |
| १८ | सरपंच-१ | निमंत्रित सदस्य |
| १९ | संचालक, मृद संधारण व पाक्षेव्य, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य सचिव |

२. प्रशिक्षण केंद्रासाठी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या अभ्यासगटातील सदस्यांचा प्रवासभत्ता आणि इतर सर्व भत्ते, सदस्य सचिव आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, तथा संचालक मृद संधारण व पाक्षेव्य, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या

स्वनिधीतून भागविण्यात यावेत. तसेच उपरोक्त अभ्यासगट हा ६ महिन्याच्या कालावधीकरिता कार्यरत राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२२०४२९१२२००७३७२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yogita Sanjay Desai

Digitally signed by Yogita Sanjay Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Soil And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bbd04a10febeb3c8b6cfa99da6ee3ed9c632fd0058158c3a11cb86e163b25ad4, serialNumber=d710fd63609eb92c2378f60caa448330b002f85bdf614f42e8ec543ce60c3951, cn=Yogita Sanjay Desai
Date: 2022.04.29 12:21:20 +05'30'

**( योगिता देसाई )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे
५. मुख्य सचिव यांचे सचिव,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिद्धीकरीता)
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
१३. कृषि उपसंचालक, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, कृषि भवन, पुणे
१४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२(लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
१५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१६. अधिदान व लेखाधिकारी / निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. कक्ष अधिकारी / जल-११, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. कार्यासन जल-८ (निवड नस्ती), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई